।। श्रीकृष्णाय नमः ।।

# अध्यात्मशास्त्रातील विविध विषयांचा बोध

मराठी (Marathi)


**लेखक**

**अनंत बाळाजी आठवले,** बी.ई. (सिव्हिल)



**सनातन संस्था**



**सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या**

मराठी ३४५, इंग्रजी २०१, कन्नड १९९, हिंदी १९७, गुजराती ७०, तेलुगु ५४, तमिळ ४४, बंगाली ३०, मल्ल्याळम् २५, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**फेब्रुवारी २०२५ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९९,१०,००० प्रती !**

।। श्रीकृष्णाय नमः ।।

# लेखकांचा परिचय



‘सनातनचे ज्ञानयोगी संत पू. अनंत बाळाजी आठवले हे सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे ज्येष्ठ बंधू आहेत. बालपणापासूनच ईश्वर आणि ब्रह्म यांविषयी जिज्ञासा जागृत होऊन त्यांनी तत्त्वज्ञानावरील अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. त्यांनी ‘गीताज्ञानदर्शन’ आणि ‘अध्यात्मशास्त्राच्या विविध अंगांचा बोध’ हे ग्रंथ लिहिले आहेत. आज वयाच्या ८८ व्या वर्षीही ते सनातनच्या संकेतस्थळासाठी मराठी भाषेतील लेखांचा हिंदी भाषेत अनुवाद करण्याची सेवा करतात, तसेच ‘सनातन प्रभात’ नियतकालिकांसाठी नवनवीन लेख लिहितात.’ – **प्रकाशक** (१६.१.२०२४)

(पूर्ण परिचयासाठी वाचा सनातनचा ग्रंथ ‘पू. अनंत आठवले यांची गुणवैशिष्ट्ये’) F (SStAnA-Pari + LG-SStAnA-Adhbo)

।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

# अनुक्रमणिका


卐 मनोगत ७

१. सर्वांचा आत्मा एक असतो, तर एकाचे सुख-दु:ख दुसऱ्याला का होत नाही ? ११

२. भक्ती असो वा ज्ञान, ईश्वर असे अधिष्ठान १४

३. मोक्षप्राप्ती एकट्याने आणि एकट्यालाच होते ! १४

४. गंगास्नान, श्रीहरीचा नामोच्चार मनुष्याला पापमुक्त करतात का ? १५

५. धार्मिक कृतींचे ज्ञान आणि आत्मज्ञानातील अंतर १७

६. पापांवर प्रायश्चित्तांचा उपयोग आणि मर्यादा १८

७. अनंतात जाण्याच्या प्रवासाची सिद्धता २१

८. पाच कोश आणि चार देह ह्यांची सांगड २३

९. आपला उद्धार आपल्यालाच करायचा आहे २७

१०. अष्टसात्विक भाव का जागृत होत नाहीत ? २९

११. ‘ब्राह्मण’ नाव कोणाचे आहे ? ३२

१२. अध्यात्मात प्रगतीसाठी सहायक क्षमता ३५

१३. आत्मज्ञानी व्यक्तीला शरीराच्या वेदना होत नाहीत का ? ३७

१४. मम आणि न मम ४०

१५. आध्यात्मिक पाथरवट बनूया ४२

१६. एका साधिकेचा अध्यात्मविषयक प्रश्न आणि
पू. अनंत आठवले ह्यांचे उत्तर ४४

१७. आत्मज्ञानाने संचित कर्मफळे नष्ट होतात ४६

१८. स्वधर्मे निधनं श्रेयः । ५८

१९. समाधी आणि सहजसमाधी ६२

२०. ब्रह्मातील आनंदाचे स्वरूप ७४

**वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।**
**देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ।**

**अर्थ** – वसुदेवाचा पुत्र; तसेच कंस, चाणूर इत्यादींचा निःपात करणाऱ्या, देवकीला परमानंद देणाऱ्या आणि संपूर्ण जगताला गुरुस्थानी असणाऱ्या भगवान श्रीकृष्णाला मी नमस्कार करतो.

।। श्रीकृष्णाय नमः ।।

# मनोगत

आता मनात काही आगतच होत नाही, तर मनोगत कसे लिहिणार ? पण ह्या संधीचा लाभ घेऊन, कदाचित् लेखांमध्ये सांगायच्या राहून गेलेल्या दोन गोष्टी मांडतो.

आपल्या सनातन धर्माचे वैशिष्ट्य आहे की ह्यात वेगवेगळे तत्त्वज्ञान सांगणारी, वेदांना मानणारी, वेदांना न मानणारी दर्शनशास्त्रे आहेत. अनेक उपासनापद्धती आहेत, अनेक विचारधारा आहेत, अनेक पंथ आहेत. प्रत्येक पंथ आपला मार्गच श्रेष्ठ मानतो, विहंगम मार्ग आहे असे सांगतो. पण असे नसते. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव, आवड-नावड, प्रवृत्ती वेगळी असते, तेव्हा सर्वांना एकच मार्ग अनुकूल नसतो. ज्याला जो मार्ग आध्यात्मिक प्रगतीसाठी आवडीचा आणि सोपा वाटेल, तो त्याच मार्गाने लवकर प्रगती करु शकेल. त्याच्यासाठी तोच विहंगम मार्ग असतो.

सनातन तत्त्वज्ञानाची आणखी एक आणि महान विशेषता ही आहे की ईश्वराचे अस्तित्वच न मानणाऱ्यांसाठीसुद्धा जन्म-मरणाच्या फेऱ्यातून सुटण्याचा, मुक्त होण्याचा उपाय आहे आणि तो आहे चित्तशुद्धी एवं निष्कामता, अनासक्ती !

आधींच्या आणि ह्या ग्रंथामधून कर्मयोग, भक्तीयोग, ध्यानयोग, ज्ञानयोग कशाप्रकारे कार्य करतात आणि सर्वच योग कशाप्रकारे मुक्तीप्रद आहेत, हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्याला मानवेल आणि करायला जमेल असा मार्ग निवडायला वाचकाला ह्या लेखांतून सहायता मिळू शकेल असे वाटते. F (LG-SStAnA-Adhbo)

सर्वांना नमस्कार आणि शुभेच्छा.

– अनंत आठवले.

।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।